# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार दि.१२/०२/०७ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य |
| ३) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | डॉ. आर. आर. पाटील, संचालक म. व. वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्य |
| ११) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १२) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १३) | प्राचार्य बी. पी. रोंगे | सदस्य |
| १४) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १५) | मा. जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १६) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्य |
| १७) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १८) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १९) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

सभेच्या सुरुवातीला सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले. यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. शिक्षण संचालक म. रा. पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. पी. जी. केचे शिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे दि.०३/०१/०७ रोजी निधन झाल्याने सभागृहाने श्रध्दांजली वाहिली.

महाराष्ट्र शासनाने सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षाकरिता डॉ. ए. एल. देशमुख प्राचार्य शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज यांना राज्य शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले याबद्दल सभागृहाने डॉ. ए. एल. देशमुख यांचे अभिनंदन केले.

**विषय क्र. [ १ ]** **दि. ९ ऑक्टोबर २००६ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. [ १ ]** **दि. ९ ऑक्टोबर २००६ द. २९ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) विषय क्र. २ मध्ये, "कलम २७ (x) नुसार" ऐवजी "कलम २८ (x) नुसार" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**२) ठराव क्र. ३ मध्ये, पहिल्या परिच्छेदामधील तिसऱ्या ओळीमधील "यांना" यानंतर "विद्यापीठ कामासाठी प्रतिदिवस रु.२५/-" असा उल्लेख करावा तसेच दुसऱ्या परिच्छेदातील "तसेच अतिथीगृहात ज्या दिवसापासून रहातात तेव्हापासूनचे भाडे घरभाडे भत्याप्रमाणे वसूल करावे असे सर्वानुमते ठरले" हे वाक्य वगळून "श्री. एम. के. कौरथी वित्त व लेखा अधिकारी यांच्याबाबतीत रु.२५/- रोज आकारण्यात यावेत आणि जोपर्यंत बाहेर निवासाची सोय त्यांच्याकडून होत नाही तोपर्यंत त्यांना अतिथीगृहात रहाण्यास परवानगी द्यावी " असा उल्लेख करण्यात यावा.**

**[कृ.मा.प.]**

३) ठराव क्र. ५ वर चर्चेवेळी कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांना रु.१२/- ऐवजी रु.१५/- प्रति तास मंजूर करुन रोज कामाचे तीनच तास असावेत असे ठरले.

४) ठराव क्र. १० मध्ये, तिसऱ्या ओळीतील "संस्थामार्फत शिक्षण घेणाऱ्या" या वाक्यापुढे "प्रथम वर्षाच्या" या शब्दाचा समावेश करण्यात आला.

५) ठराव क्र. २०(६) खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. "सोलापूर विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर नुसार ऑक्टोबर २००६ पासून पूर्वलक्षीप्रभावाने मानधन देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली."

६) ठराव क्र. २०(७) मध्ये, विषय क्र. १ मधील पान क्र. दोन वरील क्र. एक विषय क्र. १ ते विषय क्र. १९ आणि विषय क्र. २० पैकी २०(१) ते २०(६) सोडून अ.क्र. ३ विषय क्र. २०(७) व अ.क्र.४ विषय क्र. २०(८) मधील मा.कुलगुरु यांनी लिहिलेला मजकूर वगळावा असे ठरले आणि विषय क्र.२०(७) व २०(८) यास खालील दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली. अ) २०(७) महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावरील सदस्यत्व समाप्त केलेल्या पत्रास प्राचार्य बी. पी. रोंगे यांनी घेतलेली हरकत मागे घ्यावी अशी विनंती मा.श्री. जयसिंह मोहिते-पाटील आणि मा.कुलगुरु यांनी सभागृहाच्या वतीने केली. ती प्राचार्य बी.पी. रोंगे यांनी मान्य केली.

ब) ठराव क्र. २०(८) मधील लेखी पत्रे देवू नयेत व खुलासे मागवू नयेत हे शब्द वगळावेत.

वरील दुरुस्तीसह दि.९ ऑक्टोबर २००६ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

**विषय क्र. [ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल.**

**ठराव क्र. [ २ ]** सर्व विभागाकडून माहिती मागवून घेऊन मा.कुलगुरु यांनी दि.९ ऑक्टोबर २००६ ते दि.११ फेब्रुवारी २००७ आणि त्यापुढील कालावधीतील तीन महिन्यांचा (एकूण सहा महिन्यांचा) अहवाल एकत्रितपणे पुढील सभेत सादर करावा असे ठरले.

**विषय क्र. [ ३ ]** **सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या झालेल्या प्रगतीचा एकत्रितपणे प्लाझ्मा जाहिरात सोलापूर रेल्वे स्थानकावर उपलब्ध प्लाझ्मा टी. व्ही. वर देण्याबाबतचा मे. ए.व्ही. सिस्टम्स् प्रा. लि. पुणे यांचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोबत जोडलेला मे. ए. व्ही. सिस्टम्स् प्रा. लि. पुणे. यांचा सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या झालेल्या महत्वाच्या कार्यक्रमाची माहिती, विद्यापीठामार्फत चालविले जाणारे विविध अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाशी अनुषंगिक बाबी इ. माहितीची एकत्रितपणे जाहिरात सोलापूर रेल्वे स्थानकावर उपलब्ध असलेल्या प्लाझ्मा टी. व्ही. वर देण्याबाबतचा प्रस्ताव जोडला आहे.

सदर प्रस्तावात या जाहिरातीस येणारा खर्च तसेच इतर अनुषंगिक बाबी दिलेल्या आहेत.

सबब, मे. ए. व्ही. सिस्टम्स् प्रा. लि. पुणे यांचा प्लाझ्मा टी. व्ही. वर सोलापूर विद्यापीठाची जाहिरात देण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ ३ ]** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा असे ठरले.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र. [४]** **सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेणारा लघुपट निर्मितीचा "चौफेर" निर्माती अपर्णा करंदीकर यांचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

चौफेर निर्माती अपर्णा करंदीकर यांनी सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेणारा लघुपट तयार करण्याबाबत प्रस्ताव दिला आहे.

सदर प्रस्तवामध्ये लघुपट निर्मितीसाठी येणारा प्रत्यक्ष खर्चही दिलेला आहे. (सोबत प्रस्ताव जोडला आहे.)

सबब, सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेणारा लघुपट निर्मितीचा "चौफेर"निर्माती अपर्णा करंदीकर यांचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. [ ४ ]** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. [५]** **माहे फेब्रुवारी २००७ मध्ये होणाऱ्या द्वितीय दीक्षांत समारंभात पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत.**

**(टिपणी :** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अंतर्गत कलम ९६(१) नुसार पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.
"The Management Council may institute and confer such Degrees/Diplomas Certificate and other academic distinctions as may be recommended by the Academic Council."
या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस अशा पदव्या, पदविका प्रमाणपत्रे देण्याबाबत शिफारस करावयाची असते. जे स्नातक पदव्या, पदविका प्रमाणपत्रे घेऊ इच्छितात अशा स्नातकांची यादी सोबत जोडली आहे. दिनांक १८ जानेवारी, २००७ रोजी विद्यापरिषदेच्या झालेल्या सभेत विषय क्र.४४ वरील झालेल्या ठराव खालील प्रमाणे आहे.

**ठराव :- "ही विद्यापरिषद व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, तिने पात्र स्नातकांना पदव्या/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यास अनुमती द्यावी तसेच डिग्री, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्सेसच्या नावातील in ऐवजी of अशी दुरुस्ती करावी."**

सदरची शिफारस मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ५ ]** **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या स्टॅट्यूटप्रमाणे पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र (अभ्यासक्रम) यामध्ये in ऐवजी of च्या संदर्भातील दुरुस्ती आणि स्पेलिंगमधील दुरुस्तीसह विद्यापरिषदेने केलेल्या शिफारशीस मान्यता द्यावी असे ठरले.**
**विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्याबाबतचा प्रस्ताव सर्व अधिष्ठाता यांच्याकडून घेण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. [६]** **सोलापूर विद्यापीठामध्ये सुट्टीच्या कालावधीमध्ये एम. फील. सुरु**

**[कृ.मा.प.]**

**करण्याची बाब विचारार्थ.**
**(सोबत सुट्टीच्या कालावधीतील एम. फील. चे अंदाजपत्रक जोडले आहे.)**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठामध्ये सुट्टीच्या कालावधीमधील सुरु करावयाचा विषय महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या दि. १३/०६/२००६ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवला होता. सदर विषयाच्या अनुषंगाने मा. अधिष्ठाता डॉ. बी. एस. कोनापुरे, डॉ. व्ही. जे. नाईकनवरे, डॉ. एस. बी. सागरे, प्रा. एस. के. मठपती यांनी सुट्टीतील एम. फील. चे अंदाजपत्रक तयार करण्यास समितीने सांगितलेले होते. त्यानुसार मा. अधिष्ठाता यांनी सुट्टीच्या कालावधीतील एम. फील. च्या तयार केलेल्या अंदाजपत्रकास महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या दि. २९/०९/२००६ रोजीच्या बैठकीस मान्यता दिलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. [ ६ ] **पान क्र. ७५ वरील क्रमांक ७ अभियांत्रिकी विद्याशाखा वगळावे आणि विद्यापीठामध्ये सुट्टीच्या कालावधीत एम. फील. सुरु करण्याबाबतचे अधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात यावेत असे ठरले.**

विषय क्र. [७] **सोलापूर विद्यापीठामध्ये अनुदान तत्त्वावर हिंदी, बायोटेक्नॉलॉजी, एम. बी. ए., एम. फॉर्मसी हे अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठामध्ये जून २००७ पासून नव्याने अनुदान तत्त्वावर एम.ए. हिंदी, बायोटेक्नॉलॉजी, एम. बी. ए. व एम. फॉर्मसी हे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या दि. १५/०१/२००७ रोजीच्या बैठकीत चर्चा होवून सदरचे विषय सुरु करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ शिफारस केलेली आहे. सदरचे अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. [ ७ ] **अनुदान तत्वावर खालील विभागांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवावे असे ठरले.**

1) English
2) Electronics
3) Hindi
4) Economics
5) Bio-Technology
6) Industrial Chemistry
7) M.Com.

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र. [८]** **जून २००७ पासून नवीन महाविद्यालय, नवीन विषय, नैसर्गिक वाढ, तुकडीवाढ, व नवीन विद्याशाखा सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाकडे जून २००७ पासून नवीन महाविद्यालये, नवीन विषय, नैसर्गिक वाढ, तुकडी वाढ व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव आलेले होते. सदर प्रस्तावाची महाराष्ट्र विद्यापीठ कायदा ३६ (९) व ८२ (४) अन्वये महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी छाननी केलेली आहे. महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या समितीच्या दि. १५/०१/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.२ व ३ अन्वये एकमताने सदरच्या प्रस्तावांकरिता सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत. सदरच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र. [ ८ ] **जून २००७ पासून नवीन महाविद्यालय, नवीन विषय, नैसर्गिक वाढ, तुकडीवाढ व नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याच्या विषयास खालील दुरुस्तीसह मान्यता द्यावी असे ठरले.**

**१) पान क्र. ७८ वर, "विद्याशाखा" ऐवजी "अभ्यासक्रम" अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र. ७९ वरील अ.क्र.१ मधील रकाना क्र.६ मधील "पीएच.डी. मान्यताप्राप्त शिक्षक असल्यास "हे शब्द वगळावेत.**

**३) पान क्र. ८० वर, अ.क्र. १० मध्ये "कला" ऐवजी "समाजशास्त्र" अशी दुरुस्ती करावी.**

**४) पान क्र. ८१ वर, अ.क्र. १६ मध्ये "४०"ऐवजी "२०" आणि "अमान्य" ऐवजी "मान्य" तसेच पान क्र. ८१ वर, अ.क्र.१७ मध्ये, "१०००" ऐवजी "१००" अशी दुरुस्ती करावी.**

**५) पान क्र. ८७ वर, अ.क्र.१८ मध्ये, "सायन्स" ऐवजी "कॉमर्स" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**६) पान क्र. ९३ वर, अ.क्र. ४ वरील रकाना क्र. ६ मधील "विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता मान्य" हे शब्द वगळावेत.**

**७) पान क्र. ९५ वर, अ.क्र. १६ मध्ये "बी.बी.ए." ऐवजी "बी.सी.ए." आणि अ.क्र. १७ मध्ये "बी.सी.ए." ऐवजी "बी.बी.ए. "अशी दुरुस्ती करावी.**

**८) पान क्र. १०७ वर, अ.क्र. २ मध्ये, पार्वती बहुद्देशीय संस्था, मंगळवेढा यांच्याबाबतीत शिफारस "अमान्य" ऐवजी "मान्य" अशी दुरुस्ती करावी.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र. [९]** **सोलापूर विद्यापीठासाठी संपादीत करावयाच्या ५०० एकर जमिनीसाठी महाराष्ट्र शासनाने अनुदान रु.२.८८ कोटी मंजूर केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी..**

सोलापूर विद्यापीठासाठी शैक्षणिक संकुल, कर्मचारी निवासस्थाने, क्रीडा संकुल व अन्य सुविधांसाठी अधिकची जमीन विद्यापीठास मिळावी अशी सोलापूर विद्यापीठाने महाराष्ट्र शासन आणि मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागणी केलेली होती. विद्यापीठाने मौजे केगाव येथील २०६.०१ हेक्टर आर अशी एकूण २१०.९५ हेक्टर आर जमीन (५००एकर) संपादीत करण्याचा प्रस्ताव दिला होता. सदर जमिनीची एकूण किंमत रु.४.३२ कोटी इतकी आहे. भूसंपादनाची कार्यवाही सुरु होण्याअगोदर भूसंपादनाकरिता येणाऱ्या एकूण खर्चाच्या २/३ इतकी रक्कम रुपये २.८८ कोटी (रु. दोन कोटी अठ्ठयाऐंशी लाख फक्त) भरण्याकरिता विशेष भूसंपादन अधिकारी सोलापूर यांनी विद्यापीठास कळविले आहे. विद्यापीठाने सदर जमीन संपादनासाठी शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी शासनाकडे केली होती.

सोबतच्या शासन निर्णयानुसार शासनाने भूसंपादनासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी २/३ रक्कम रु. २.८८ कोटी मंजूर केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [ ९ ]** **सोलापूर विद्यापीठासाठी संपादीत करावयाच्या ५०० एकर जमिनीसाठी महाराष्ट्र शासनाने अनुदान रु.२.८८ कोटी मंजूर केल्याच्या बाबीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**पुढे असेही ठरले की, निधी समितीमध्ये प्राचार्य बी. पी. रोंगे आणि प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यांची नांवे समाविष्ट करावीत.**

<u>**आयत्या वेळेचे विषय :-**</u>

**विषय क्र. [१०]** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordinance O.५९ प्रमाणे गठीत केलेल्या समितीच्या बैठक दि. २ जानेवारी २००७ रोजी झाली. सदरच्या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदरच्या शिफारशींना Ordinance O.६५ प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसाठी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ १० ]** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [११]** **के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या**

**महाविद्यालयाच्या नैसर्गिक वाढीच्या प्रस्तावाची शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ..**

टिपणी : के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयास जून २००४ पासून बी.एस्सी. भाग १ अभ्यासक्रमास शिकविण्यास मान्यता दिली. महाविद्यालयाने जून २००५ पासूनच्या बी. एस्सी. भाग २ व ३ नैसर्गिक वाढीच्या संलग्निकरणास मान्यता मिहण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविलेला आहे. वास्तविक बी. एस्सी. भाग २ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचा व संलग्निकरणाचा प्रस्ताव दि. ३१ ऑगस्ट २००४ पर्यंत आणि बी. एस्सी. भाग ३ च्या नैसर्गिक वाढ व संलग्निकरणाचा प्रस्ताव दि. ३१ ऑगस्ट २००५ पर्यंत सादर करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात हे प्रस्ताव दि.३/२/२००७ रोजी सादर केलेले आहेत.

प्रस्ताव विद्यापीठाकडे वेळेत सादर न करणाऱ्या महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दंड आकारते. त्यांच्या परिपत्रक क्र. ८ मधील पान क्र. ५ Ordinance १३० (i) (a) प्रमाणे प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत सदरच्या प्रस्तावाच्या फीसह प्रत्येक महिन्याला रु.१०००/- याप्रमाणे दंड आकारण्यात यावा असा नियम आहे.

महाविद्यालयाच्या बी. एस्सी. भाग २ व ३ च्या नैसर्गिक व संलग्निकरणाचा प्रस्ताव "महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ" यांच्या वतीने मा.कुलगुरु यांनी सदरच्या प्रस्तावाकरिता शिफारस केलेली आहे. सदरची बाब माहितीसाठी

सदरचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..

ठराव क्र. [ ११ ] **के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयाच्या नैसर्गिक वाढीच्या प्रस्तावाची शासनास शिफारस नियमाप्रमाणे Ordinance १३० (१) (a) प्रमाणे प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत प्रस्तावाच्या फीसह प्रत्येक महिन्याला रु.१०००/- याप्रमाणे दंड भरण्याच्या अटीवर व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

विषय क्र. [१२] **सोलापूर विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाच्या सुधारित शुल्काचा Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**
**(सोबत सदरचा नियोजित Ordinance जोडला आहे.)**

(टिपणी : जून २००६ पासून सोलापूर विद्यापीठ व महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद सदस्य यांची प्राचार्य जे. के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. पी. जी. मोरे, डॉ. डी. डी. रणनवरे, प्राचार्य के. एम. जमादार व श्री. एस. के. मठपती यांची संयुक्त समिती विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने गठत केलेली होती. सदरच्या समितीने विद्यापीठातील व विविध महाविद्यालयातील शुल्क निश्चित करुन त्यास व्यवस्थापन परिषदेने दि.९/१०/२००६ च्या बैठकीत ठराव क्र. १३ अन्वये सुधारित शुल्कांना मान्यता दिलेली होती. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाीठी.

सदरच्या शुल्कांमध्ये B.Sc. Enterpreneurship या अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यात आलेले नव्हते. याकरिता सदरच्या समितीची बैठक दि.८/२/२००७ रोजी झाली व सदर अभ्यासक्रमाच्या शुल्क निश्चित केलेले आहे. सदरचे शुल्क व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ व ५४ अन्वये सदरच्या शुल्काचा Ordinance तयार करुन त्यास मा.कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सदरचा Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र. [ १२ ] **सचिव शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांचे पत्रानुसार BSLLB आणि**

**LLB या अभ्यासक्रमाच्या शुल्काचा समावेश करुन Ordinance तयार करुन मा.कुलपती यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावा असे ठरले.**

विषय क्र. [१३] **महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण प्रशिक्षक परिषद या संघटनेचा विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संघटनांच्या यादीमध्ये समावेश करुन वार्षिक अधिवेशनास उपस्थित रहाणाऱ्या शिक्षकांना कर्तव्यरजा देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर..**

टिपणी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण प्रशिक्षक परिषद, सोलापूर यांच्याकडून मा.कुलगुरु यांना दि.३/२/२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी सदरची मागणी केलेली आहे. सदरच्या पत्रामध्ये त्यांनी उपरोक्त परिषद सन १९७२ पासून महाराष्ट्रातील एकमेव अशी शिक्षणशास्त्रासंबंधी काम करणारी शैक्षणिक परिषद आहे. या परिषदेमध्ये बी.एड., एम.एड., एम.फील. व पीएच.डी. शिक्षणशास्त्रासंबंधी सखोल असे विचारमंथन केले जाते तसेच शिक्षणशास्त्रात येणारे नवनवीन प्रवाह व संकल्पनांची साकल्याने ओळख करुन देण्याचे काम ही परिषद गेले २८ वर्षे करीत आहे. दरवर्षी या परिषदेतर्फे महाराष्ट्रातील विविध भागातील महाविद्यालयात अधिवेशने भरविले जातात.

या परिषदेचे महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांशी संलग्न असणाऱ्या विविध महाविद्यालयातील ५५० आजीव सदस्य आहेत. या संघटनेस शिवाजी विद्यापीठासह महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी मान्यता दिलेली आहे. आपल्या विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संघटनांच्या यादीमध्ये आमच्या या संघटनेचा समावेश करावा व वेळोवेळी होणाऱ्या अधिवेशनास उपस्थित रहाणाऱ्या शिक्षकास कर्तव्यरजा मिळावी अशी विनंती संघटनेच्या अध्यक्षांनी केली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..

ठराव क्र. [ १३ ] **महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण प्रशिक्षक परिषद या संघटनेचा विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संघटनांच्या यादीमध्ये समावेश करुन वार्षिक अधिवेशनास उपस्थित रहाणाऱ्या शिक्षकांना कर्तव्यरजा देण्याबाबतच्या बाबीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

विषय क्र. [१४] **कार्यालयीन कामकाजासाठी पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

कार्यालयीन कामकाजासाठी मनुष्यबळ पुरविण्यासाठी दैनिक सकाळमधून दि.११/११/२००६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्या अनुषंगाने कार्यालयाकडे एकूण ११ ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या. निविदा उघडण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने निविदा दि.४/१२/२००६ रोजी उघडल्या. दि.६/१२/२००६ रोजीच्या टिपणीवर झालेल्या आदेशानुसार निविदा सोबत जोडलेली कागदपत्रे व दिलेल्या दरांची तपासणी करुन ठेका निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली.

त्या समितीने दि.१५/१२/२००६, दि.२७/१२/२००६ व दि.४/१/२००७ रोजी सभा घेवून प्राप्त निविदांचा अभ्यास व तुलनात्मक तक्ता तयार करुन ज्या ठेकेदाराचे दर किमान वेतन कायद्याप्रमाणे असून इतरांपेक्षा कमी आहेत अशा मे. प्राईमा ग्रुप यांच्याबरोबर पुढील ११ महिन्यासाठी त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना चेकने वेतन देण्याच्या अटीवर करार करावा अशी शिफारस केलेली आहे.

समितीच्या शिफारशीनुसार मे. प्राईमा ग्रुप यांच्याबरोबर दि.१/२/२००७ पासून पूर्वलक्षीप्रभावाने ११ महिन्यासाठी करार करण्यासाठी व रु.१५,२१,३२३.१०/- इतक्या खर्चास मा.कुलगुरु यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे. प्राईमा ग्रुप यांना आदेश काढण्यात आलेले आहे.

मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेस माहितीसाठी सादर.

**[कृ.मा.प.]**

ठराव क्र. [ १४ ] कार्यालयीन कामकाजासाठी पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरवण्याच्या प्रस्तावावर मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

विषय क्र. [१५] सोलापूर विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३०% जागा राखीव ठेवणेबाबत.

ठराव क्र. [ १५ ] सोलापूर विद्यापीठातंर्गत वेगवेगळ्या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठासाठी सोलापूर विद्यापीठामध्ये आणि महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम अद्यापपर्यंत पूर्णतः सुरु झालेले नसल्याने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी त्यांच्या शैक्षणिक अधिविभागांमध्ये सोलापूर विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना ३०% जागा प्रवेशासाठी राखून ठेवाव्यात अशी विनंती शिवाजी विद्यापीठास करावी असे ठरले.

मा.कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
डॉ. आय. एस. स्वामी
अध्यक्ष.

[कृ.मा.प.]